**फौ.ख.क्र : १४८/पी.डब्ल्यु./२०२३**                **निशाणी क्र.१४**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ याची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : संदीप रामप्रताप सिंग.

वय : ४२ वर्षे,

व्यवसाय : मॅनेजर.

निवासस्थान : गोरेगाव, मुंबई.

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती आर. ए. उपाध्ये यांचेकडुन शपथेवर सुरू :**

**१.** मी सन २०२२ साली फिनिक्स मॉल लोअर परेल येथे एका बुटाच्या दुकानात मॅनेजर म्हणुन काम करत होतो. दि.०२.०९.२०२२ माझेकडे ७ लोकांचा स्टाफ होता. त्यात संदीप गुप्ता व आरोपी नियाज हा देखील स्टाफमध्ये होता. २ तारखेला आम्ही मागच्या महिन्याची सॅलरी चॉर्ट बनवली होती. त्यात आरोपी नियाजला तो चॉर्ट मान्य नव्हता. त्याने सॅलरी स्लीप मागितली. त्याला सांगितले की, सॅलरी स्लीप नंतर बनेल. परंतु, त्याने त्याचवेळेस त्याची मागणी केली. मी माझे सिनीयरला ती बाब सांगितली. शोयब कचरा हा सिनीयर होता. तो ३ तारखेला येतो असे म्हटला.

**२.** दि.०३.०९.२०२२ रोजी आमचे सिनीयर शोयब कचरा तिथे आले त्यांना मी सर्व घटना सांगितली. त्याने देखील आरोपीला सांगितले की, सॅलरी स्लीप नंतर मिळेल. आरोपीने मला आताच हवे असे सांगितले. सिनीयर देखील सांगितले की, आता मिळणार नाही. आरोपी म्हटला की, मी आता काम करणार नाही. मी म्हटले ठिक आहे. टिफीन घेवुन तो दुकानाबाहेर गेला. तेथुन तो शिवीगाळ करु लागला. तुम्ही चोर आहात असे म्हणु लागला. मॉलच्या बाहेर आपण

बोलु असे तो म्हटला. मी त्यासोबत बाहेर गेलो. मी पुढे जात होतो तो माझे मागे होता. मी मागे वळलो असता त्याच्या हातात हातोडी दिसली त्याने माझे डोक्यावर मारली. तो तिथुन निघुन गेला त्यानंतर मी जे.जे. हॉस्पीटलला गेलो. तेथुन पोलीस स्टेशनला येवुन तक्रार दिली. माझे डाव्या डोळ्याच्या वरती कपाळाजवळ मार लागला होता व डोळे पुर्ण काळे झाले होते. आता मला छापील खबर दाखवली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला निशाणी क्र.१५ देण्यात येत आहे.

**सरकारी वकिलांच्या विनंतीवरुन मुद्देमालासाठी सरतपास तहकुब.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

KISHOR GORAKH CHAUDHARI

Digitally signed by KISHOR GORAKH CHAUDHARI
Date: 2026.06.09 18:53:14 +0530

**(किशोर जी. चौधरी)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**१३वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०९.०६.२०२६**